दै. पुढारी दि. 02.09.25.

# अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला

## ३० लाखांचा ऐवज जप्त



**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** अतिवृष्टीनंतर पाण्याची पातळी ओसरल्याने वाळूमाफियांनी पुन्हा आपले डोके वर काढले असून असर्जन येथील घाटावरून बेकायदेशीर उपसा करून वाळूची वाहतूक करणारा एक हायवा जप्त करून ग्रामीण पोलिसांनी ३० लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

नांदेड शहर व जिल्ह्यात गेल्या आठवड्यात अतिवृष्टी झाली होती. अतिवृष्टीमुळे गोदावरीसह अन्य नद्यांना पूर आला होता. कालपासून हा पूल ओसरत चालल्यानंतर वाळू माफियांनी पुन्हा एकदा अवैध वाळू उपसा सुरू केला आहे. रविवारी मध्यरात्री एक अवैध वाळू घेऊन जाणारा हायवा ग्रामीण पोलिसांनी अडवला. पोलिस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे, पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने विष्णुपुरी परिसरात हा हायवा अडवल्यानंतर कागदपत्राची मागणी केली. परंतु संबंधितांना आवश्यक ती कागदपत्रे दाखविली नाहीत.

पोलिसांनी या प्रकरणी हायवाचा ड्रायव्हर प्रेमचंद संभाजी भोकरे (वय ३९) याला ताब्यात घेतले. हायवा व पाच ब्रास रेती असा एकूण ३० लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पोलिस अधीक्षकांनी या कारवाईबद्दल ग्रामीण पोलिसांचे कौतुक केले आहे.

नांदेड जिल्ह्याच्या वेगवेगळ्या भागात अवैध वाळू उपसा व अवैध वाळू वाहतूक करण्यासंदर्भात महसूल तसेच पोलिस विभागाचे अधिकारी, कर्मचारी ॲक्शनमोडवर आहेत. सध्या सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन बंदोबस्तात आहे. तर अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात महसूल प्रशासन व्यस्त आहे. याचाच फायदा घेऊन वाळूमाफिया सक्रिय झाले आहेत.